# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२९ (            ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात इरास्मस प्लस क्षमता विकास उपक्रमांतर्गत दुसऱ्या प्रशिक्षण वर्गाची सुरुवात आज बुधवार, दि. २९ ऑगस्ट, २०१८ रोजी झाली.

या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या हस्ते झाले. `असेसमेंट व ग्रेडींग` या मुख्य थीम वर आयोजित केलेल्या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात एकूण १५ प्राध्यापकांचा सहभाग आहे. या प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणासाठी युरोपियन पार्टनर विद्यापीठांपैकी फ्रेडरीक विद्यापीठ, सायप्रस येथील प्रा.पॅनोस कन्स्टॅन्टीनीडस् हे तज्ज्ञ प्रशिक्षक प्रशिक्षण देत आहेत. विद्यापीठातील डॉ.राम भावसार व प्रा.अनिल डोंगरे सहप्रशिक्षक म्हणून सहभागी आहेत.

प्रारंभी समन्वयक प्रा.ए.एम.महाजन यांनी प्रास्ताविकात या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत झालेल्या व भविष्यात नियोजित असलेल्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. याप्रसंगी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.अनिल डोंगरे यांनी केले तर डॉ.राम भावसार यांनी आभार मानले. उदया दि.३० ऑगस्ट रोजी या प्रशिक्षणाचा समारोप होईल.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 29 ऑगस्ट, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी